| ३५ | रणजितसिंह हिरासिंग राठोड | लिपीक(बाधकाम विभाग अमरावती) |
| ३६ | अजय मधुकरराव फाटे | रेल्वे |
| ३७ | कुं.माधूरी रामकृष्ण उईके | परिचर(जि.प.अमरावती) |

| | | |
|---|---|---|
| ३८ | प्रमोद केशव टेकाळे | पोलीस(बुलढाणा) |
| ३९ | आशिष दिनेशराव वानखडे | पोलिस (अमरावती शहर) |
| ४० | पवन रामराव पवार | पोलिस (अमरावती शहर) |
| ४१ | राजेश मारोतराव पवार | z.p.अमरावती (लिपीक) |
| ४२ | संदिप भिमराव बिलबिले | z.p.अकोला (लिपीक) |
| ४३ | अमोल प्रकाशराव सावंत | समन्वयक(ग्रामिण जिवन ज्योती अभियान अमरावती) |
| ४४ | भुषण सुरेंअ्र देशमुख | समन्वयक(ग्रामिण जिवन ज्योती अभियान अमरावती) |
| ४५ | अर्जून नंदकूमार चांगोले | समन्वयक(ग्रामिण जिवन ज्योती अभियान अमरावती) |
| ४६ | विनोद मनिराम तुनगर | लिपीक(S.T.महामंडळअमरवती) |
| ४७ | शशिकांत नथ्थूजी पाचघरे | लिपीक(नांदेड) |
| ४८ | अमोल पाडूंरगजी इखार | लिपीक(बॅक) |
| ४९ | अविनाश सुमेरसिंग राठोड | पोलीस शिपाई(वर्धा) |
| ५० | श्रीकृष्ण वसंतराव लेहारकर | M.P.S.C. (लिपीक)२०१३ |
| ५१ | चितांमण जनार्दन वारवोरे | M.P.S.C. (लिपीक)२०१३ |
| ५२ | कुं.पुनम उत्तमराव जळमकर | बॅक(पुने) |
| ५३ | रूपेश हरीभाउ राउत | लिपीक (नागपुर)२०१३ |
| ५४ | कुं.जयश्री ज्ञानेश्वर रामटेके | M.P.S.C. (लिपीक)२०१३ |
| ५५ | प्रविन उत्तमराव कथे | महिला बालकल्यान विभाग अमरावती |
| ५६ | योगेश सुभाषराव मिलके | अकोला(आरोग्य विभाग) |
| ५७ | ज्ञानेश्वर भाना यवले | M.P.S.C. (लिपीक)२०१३ |
| ५८ | सुरज रतनसिंग छाडी | तलाठी(नागपुर) |
| ५९ | उमेश बाबूराव नवरे | लिपीक |
| ६० | सागर श्रीकृष्णराव भातूरकर | P.S.I.(रेल्वे) |
| ६१ | गुणवंत जयारामजी बन्सोड | लिपीक(नागपुर) |
| ६२ | तुषार रघुनाथराव इंगळे | लिपीक (जलसंपदा नागपुर) |
| ६३ | कुं.संपदा तेजराव देशमुख | S.T.I.( M.P.S.C.)२०१२ |
| ६४ | भावेश यशवंतराव किर्तने | नागपुर(आरोग्य विभाग) |
| ६५ | पुरण रामलाल धांडे | Softwere engineer (अचलपुर नगरपरीषद) |
| ६६ | नितीन गजाननराव इंगळे | शिक्षक(समाज कल्यान विभाग अकोला) |
| ६७ | देवानंद सुरेशराव शेवतकर | लिपीक(S.T.महामंडळ) |
| ६८ | हेमंतकुमार अशोकराव सातंगे | तलाठी(यवतमाळ) |

कोणतेही यश मिळविण्यासाठी योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. योग्य मार्गदर्शन मिळाल्या बद्दल येथील सर्व कर्मचाऱ्यांचे आणि मित्रांचे आभार मानतो. यश हे अपयशाच्या पाठिमागे लपलेले असते ते फक्त आपल्याला शोधावे लागते. अभ्यास किती करतो याला महत्व नाही तर अभ्यास कसा करतो याला अधिक महत्व आहे.

जिओ इतना की जिंदगी कम पड जाए।
हसो इतना की रोना कम पड जाए,
कुछ पाना तो किस्मत का खेल है,
लेकिन मेहनत इतनी करो की खुदा
देनेपर मजबुर हो जाए।

सर्वांना पुढील भावी आयुष्यासाठी आणि परिक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा।

[signature]
आपलाच विश्वासू



नाव :- आशिष दिनेशराव वानखडे

पत्ता :- अप्पर वर्धा कॉलनी क्वॉ. ८-डी शिवा नगर अमरावती

शिक्षण :- B.A

नोकरी (पद) :- पोलीस (शिपाई)

सभासदांचे मनोगत :- मी सर्वप्रथम वसतिगृहात दि. 2/3/2009 मध्ये प्रवेश मिळाला. तेव्हा पासून मी वसतिगृहातील मुलांच्या चर्चा गटात शामील झालो तेव्हा अभ्यास कसा करावा, किती करावा, अशी छोट-छोट गोष्ट त्या चर्चा गटाकडून मला समजू लागली नंतर त्याच प्रमाणे चर्चा गटातील मित्रांच्या सांगण्यावरून रोजचा विषय घ्यायचा त्याच्यावर चर्चा करावी नंतर त्याच्या प्रश्नपत्रिका काढवी असा अभ्यासाचा कार्यक्रम सुरु झाला. अभ्यास करताना काही अडचणी आल्यास त्याची निरसन करण्यासाठी आम्हाला PSI मनिष गावंडे यांची मोलाची मदत झाली योग्य वेळी योग्य सल्ला दिला सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अभ्यासक्रमाची साहित्य पुस्तके मासिके पुरविण्याचे काम प्रविण भाऊ आणि डोंगरे सरांनी केले. त्याचे शतशः आभार शेवटी पदयमाकडून मोलाची मदत झाली सोयी सुविधा लाभल्या कशाचीच अडचण भासली नाही

~~अक्षा~~ अशा नरेंद्र वानखेडे साहेबाचे मनापासून आभार या कामाच श्रेय माझे मित्र आई वडील तसेच मला वेळोवेळी मदत करणाऱ्यांना कारण ज्याचे ज्याचे श्रेय त्याला त्याला देणे योग्य ठरते अशाच प्रकारे या ग्रंथालयातील माझ्या सारखेच विद्यार्थी यशस्वी होवो आणि उच्चपदस्त अधिकारी होवो अशी ईश्वर चरणी प्रार्थना !

आपलाच विश्वासू

(signature)

आशिष दिनेश वानखेडे

Page No. :
Date : / /

नाव :- तुषार र. इंगळे

पत्ता :- आर.बी. इंगळे, गाडगेनगर, अम.

शिक्षण :- B.SC

नोकरी (पद) :- प्रयोगशाळा सहाय्यक

सभासदांचे मनोगत :-

मी मिंमाचे मनोगत सांगताना, सर्वप्रथम, माझ्या आई-वडिलांचे, शैक्षणिक, क्षेत्रातील माझ्या गुरूंचा आभार मानतो कि ज्यांना मला प्रत्येक वेळा माझ्या वैयक्तीक निर्णयाचे समर्थन केले आणि माझे ध्येय मी त्यांच्यासमोर ठेवल्यामुळे मी माझ्या परिक्षेची तयारी चांगल्याप्रमाणे करू शकलो. मी या ग्रंथालयात ज्यावेळेस आलो. त्यावेळेस माझ्या ग्रंथालयातील सर्वांनी मला परिक्षेबद्दल अर्थात माहित असलेली माहिती पूर्णपणे दिली आणि या ग्रंथालयातील सर्व सुविधांचा चांगल्याप्रमाणे वापर करून मी माझे यश प्राप्त केले.

मि या ग्रंथालयातील सर्वेश्री असे श्री नरेंद्र वानखेडे सरांचे आभार मानतो कि त्यांनी मला सभासदाची संख्या पूर्ण झाल्यावरही, तरी त्यांनी एक माणूस म्हणुन पाहून बसण्याची परवानगी दिली. त्यांचीच प्रचीती म्हणुन आपलेही काहि काही

Teacher's Signature

जबाबदारी होतीच कि. आपण
कर्तव्य म्हणून एक जबाबदारी होतीच कि. आपण
सुद्धा काही सरकारी नोकरी मध्ये मिळवावं. असं सतत
जाणवायचं. या मुळेच मी प्रत्येक क्षेत्रातील परिक्षेत
बसण्यास आग्रही राहायचो. सर्वांनी आम्हाला वेळोवेळी
मार्गदर्शनाची साथ होती. की ज्यांनी हा प्रेरणादायी
व सर्वसामान्यांचे जिवन घडविणारा प्रकाश हाती घेतला
व एक समाजमानाने एक चांगले काम केले व या
समाजसेवी उपक्रमात प्रत्येकांनी भाग घेऊन अनेक
विद्यार्थीया ग्रंथालयात येऊन आपले आयुष्या चांगल्या
प्रमाणे घडवतील अशी आशा बाळगतो.
तसेच या ग्रंथालयातील माझे सर्व मित्र, तसेच
श्री. डोंगरे सर व प्रविन भाऊ चौधरी याचे हि आभार
मानतो, कि ज्यांनी ~~आम्ह~~ मला वेळोवेळी मार्गदर्शन केले
शेवटी मी माझ्या ग्रंथालयातील सर्व
मित्रांना येणाऱ्या सर्व स्पर्धा परिक्षा साठी शुभेच्छा
देतो.

आपला विश्वासू
Avinash
Dt. 2/



नाव :- Puran Ramlal Dhande (9503421133)
purandhande@gmail.com

पत्ता :- Police Quarters. Achalpur

शिक्षण :- B.E (Information Technology)

नोकरी (पद) :- Software Engineer
(Achalpur Municipal Council)

सभासदांचे मनोगत :-

First of all, I am really and hearty thankful to Mr. Wankhade Sir, Dongre Sir and ~~Sir~~ Pravin Sir for running such desireable institute. I am ~~meanti~~ mentioning here Institute because ~~the~~ though it is a library, it is creating the student of great caliber.

I have done engineering in information technology. After completion my degree I was dilema that what ~~to~~ to do next. So after long thinking I have decided to prepare for MPSC. ~~Bor~~ Then in mid of 2011 i came back to Amravati start preparing for MPSC.

I used to study at home. But After some time after giving my 1st attempt to STI and MPSC pre I relised that I need to join some library or class for further study.

My beloved friend Roshan told me about this library. Istantly I joined the library. After joining library I relised that there is great improvement in my study. The library consist of huge no. of books for compatative exams. Many times it conduct guest lectures which are very helpful for the library student.

The atomosphere here is great to study. One book lover can definatly love this place.

There is lot to tell about this lib. but I can say only one thing that this is the place where I studied by my heart and got my 1st job. All heasty thanks to library man

Bhau
(Punam D

Page No.:
Date: / /



नाव :- शशिकांत नरसुजी पाचघरे

पत्ता :- मु. पो - बोरगांव (धर्माळे)
ता. जि. अमरावती PIN 444602

शिक्षण :- B.A., Agri-Diploma

नोकरी (पद) :- लिपीक (तहसिल कार्यालय नायगांव (खै), जि - नांदेड)

सभासदाचे मनोगत :-

सर्व प्रथम मी मा[illegible] आई वडीलांचे व माझ्या परीवाराचे आभार मा[illegible] ~~व त्यावतर~~ ज्यानी मला शिकवीले व मोठे के[illegible] व त्यानंतर शिक्षकाचे व या लाब्ररीचे मन:पूर्वक आभार मानतो ज्यामुळे मी शासकीय सेवेत रूजू होउ शकलो. 2012 जून महिन्यामध्ये मला या लाब्ररीमध्ये प्रवेश मिळाला व अवघ्या 8-10 महि[illegible] मला जॉब मिळाला यामागे श्री वानखे[illegible] सर, श्री डोंगरे सर व श्री प्रविन सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले

या लाब्ररीमध्ये अभ्यास करत असतांना सर्व मित्रांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या सहवासात राहुन अभ्य[illegible] करण्याची जिद्द वाढली. त्यामुळे त्यांचेही [illegible]

again

ह्यो मनापासून अभिनंदन करतो.

या लायब्ररीमध्ये सुरू झालेल्या विविध विषयांच्या बॅचेस व तज्ञ मंडळींचे म… मार्गदर्शन मिळाले. व या लायब्ररीतील पुस्तकां… वापर करून मला भरपूर माहिती मिळाली

स्पर्धा परिक्षेतील अभ्यास करणाऱ्या माझ्या मित्रांना शुभेच्छा देऊन माझे मनोग… संपवतो.

आपला विश्वासू

२८-०५-13

शशिकांत पानघरे



नाव :- आशिष नथ्थुजी येचरे

पत्ता :- रा. पुष्कराज कॉलनी, लालुर्णा रोड, अमराव

cel. no. 9967448015, 9766632842

शिक्षण :- B.A. (मराठी)

नौकरी (पद) :- पोलीस उप. निरिक्षक,

सभासदांचे मनोगत :- प्रिय मित्रांनो, सर्वप्रथ
माझे आई-वडिल, माझे वडिल-बंधु तसेच माझे प्रेरणा
मनोजदादा, माझे अभ्यासातील सहकारी मित्र राहुल
जांगळे, अविनाश तराळ, दिप तराळ, व लायब्ररीचे
मार्गदर्शक श्री जेंगटे सर यांचे मन:पुर्वक आभार
मानतो.

प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये एक अशी घटना घ
ज्यामुळे त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळते. तसे
काहितरी माझ्यासोबत घडले. 15 जुलै 2005 रोजी
जेव्हा मी पोलीस कॉन्स्टेबल म्हणुन पोलीस खात्या
दाखल झालो त्यावेळी मला MPSC चा गंध ही
DySP अमोल तांबे हिच ती व्यक्ती ज्यांकडे पाहु
पहील्यांदा असे वाटले की, आता आपण अधिका
झाले पाहीजे, पण त्यामध्ये भरपुर अडथळे
येणार याची खात्री होती. दरम्यानच ज्या
शिकवणी ची आवश्यकता होती ती लावली. म

मित्र, कोरे सर्वांना विचारायचो की, हे MP असतं तरी काय? उत्तर काहि केल्या मिळत नव्हते. पण त्या जिज्ञासेने आता पेट घ्यायला सुरुवात केली होती. त्या काळात मी माझी पदवी पुर्ण करत होतो. वर सांगितल्या प्रमाणे माझे बंधु MPSC चा अभ्यास करत होते त्यांनी मला धाबुरेकर सरांकडे पाठवले व आम प्रवास सुरु झाला. मला सरांनी योग्य दिशा दिली. तेथेच माझी श्री. राहुल जांगळे यांच्याशी ओळख झाली. मी पोलिस दलात काम करीत असल्याने वेळेचे बंधन येत होते. MPSC च्या विश्वात नवीन घडामोडी काय होताहेत? याची इत्थंभुत माहिती मित्रांकडुन मिळाली मला अमरावती महानगरपालिका अभ्यासिकेच माहिती मिळाली. आदरणीय श्री डोंगरे सर, श्री वानखडे सर यांनी आम्हाला मोलाचे मार्गदर्श करून सहकार्य केले. अभ्यासिकेत अभ्यास करण्याचा तसा हा माझा पहिलाच experien होता. येथील वातावरण व मार्गदर्शन करणा- मित्रांचा Seriousness मला येथपर्यंत घेऊन आला.

मित्रांनो, स्वप्न पहा! (खरंच पहा) आणि मेहनत करा, संयम ठेवा, यश मिळतंच!

Big Things..... Take time!



नाव :- पंकज हिम्मतराव कांडलकर
7620115262

पत्ता :- अनगड नगर शेगाव रोड V.M.V Post
अमरावती

शिक्षण :- B.com

नोकरी (पद) :- अमरावती शहर पोलीस कॉन्स्टेबल

सभासदाचे मनोगत :-

सर्व प्रथम मी माझे आदरनिय गुरु धुंरधर सर यांचे मी आभार मानतो की त्यांनी मला चांगल्या प्रकारे मार्गदर्शन दिले त्यामुळे मला आज माझ्या जिवनातील पहीली पायरी आज मला मिळाली. ते म्हणजे पोलीस कॉन्स्टेबल या रुपामध्ये

तसेच मी माझ्या आई वडीलाचे मी मनापासुन आभार मानतो की त्यांनी मला चांगल्या विशेषी व चांगल्या समर्थनात त्यांनी मला साथ दिली. पुन्हा त्यांचे आभार मानतो.

तसेच या ग्रंथालयामधील श्री विरेन्द्र ठोंगे सर यांचे ही आभार मानतो की त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केले

तसेच मी माझ्या सर्व मित्राना स्पर्धा परिक्षा साठी शुभेच्छा देतो.

आपला विश्वासु
P. H. Kadk



नाव :- साहेबराव भानूदासजी गवळी

पत्ता :- मू. परसोडा पो. खडकी ता. आर्वी जि. वर्धा
Mob. 7385993891

शिक्षण :- B.A. (E.L.t)

नौकरी (पद) :- 1) एम. पी. एस. सी. क्लर्क, 2) समाज कल्याण पूणे क्लर्क, 3) माहिती तंत्रज्ञान अमरावती, 4) गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

सभासदांचे मनोगत :-

सर्वांना सस्नेह नमस्कार,

मी साहेबराव भानूदासजी गवळी मू. परसोडा पो. खडकी ता. आर्वी जि. वर्धा या छोट्याश्या खेड्यातील विद्यार्थी. मी एक ते दिड वर्षात चार क्लर्क पदासाठी पात्र झालो. सुरवातीला मला स्पर्धा परिक्षेविषयी काहीच माहीती नव्हती. परंतू ग्रंथालय सुरू केल्यानंतर सर्व माहीती मिळाली. ग्रंथालयातील डोंगरे सर, चौधरी सर, गांवडे सर, यांनी पुस्तकाविषयी व अभ्यासाविषयी मनापासून मदत व मार्गदर्शन केलं. तसेच येथील मित्रांनीसुध्दा बरीच मदत केली मला असे वाटते की घरच्यापेक्षा मित्रामध्ये ग्रंथालयात अभ्यास करणे अधीक फायद्याचे ठरते. आणि विशेष म्हणजे ग्रंथालय सुरू ~~~~ ~~~~ करणारे श्री. वानखेडे सरांचे शतशः

'आभार'

"If you want to success
you must be narrow minded."

(signature)

Page No. :
Date : /



नाव :- संतोष विठ्ठल बोयणे

पत्ता :- 'अनुकुल निवास', प्रकाश नगर, लातूर.
mob - 9404774749

शिक्षण :- Bachelor in Fisheries Science.

नोकरी (पद) :- पोलीस उपनिरीक्षक (PSI)

## सभासदांचे मनोगत :-

सस्नेह नमस्कार,

सर्वप्रथम श्री मा. वानखडे सरांचे आभार प्रकट करू इच्छितो की त्यांनी वाचनालयाच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षांचा अभ्यास करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

आणि याचीच परिणिती आहे की आज माझ्यासारखा तरूण पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घालू शकला आहे. या माझ्या यशात माझे सर्व मित्र-मैत्रीणी, कर्मचारी वृंद यांचा मोलाचा वाटा आहे.

माझी अशी इच्छा आहे की, या ग्रंथालयाचा वटवृक्ष असाच उत्तरोत्तर विस्तारत राहो आणि मोठ्या संख्येने येथील विद्यार्थी, एक कार्यक्षम अधिकारी म्हणून प्रशासनात यावेत.

Always bear in mind that your own resolution to succed is more important than others.

Teacher's Signature



नाव :- कु. सोनाली हरिश्चंद्र बुध

पत्ता :- पोलिस रिझर्व लाईन क्वॉ.नं. ३८३, अमरावती

शिक्षण :- M.A. [History]

नोकरी (पद) :- ग्रामसेवक

## सभासदाचे मनोगत :-

मी, कु. सोनाली बुध सर्वप्रथम या ग्रंथालयाचे मुख्य श्री. वानखडे सर यांचे आभार मानते. की, त्यांनी येथे ग्रंथालय चालु करुन आम्हा सर्वांना येथे अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करुन दिली. व त्यामुळे आम्ही आपले ध्येय गाठू शकणार.

या ग्रंथालयात बरेच बरेच पुस्तक वाचण्यासाठी व अभ्यासायोग्य असून आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना येथील पुस्तके वाचुन व आपले ध्येय सहज प्राप्त करता येते.

अनेक विद्यार्थ्यांनी या ग्रंथालयाचा उपयोग करुन घ्यावा हे इच्छा.

ग्रंथालयाने मला येथील सभासद होवु दिले त्याबद्दल मी आभारी आहे.

येथील कर्मचारी सुद्धा चांगले आहे.
विशेषत: प्रविण भाऊ विद्यार्थ्यांशी मनमिळाऊ
पणाने वागतात.
माझ्या यशात माझे मित्र-मैत्रिणी
व येथील कर्मचाऱ्यांच्या मोलाचा वाटा आहे.
त्यामुळे मी माझे अपेक्षित ध्येय प्राप्त
करू शकलो.

आपली विश्वासू

ग्रंथालयातील सर्व विद्यार्थ्यांकरिता

" तुम्ही जर स्पर्धेला
घाबरलात तर तुम्हाला
सर्व जण शत्रु वाटु लागतील;
परंतु जर हसतमुखाने स्पर्धेला
सामोरे गेलात तर तुम्हाला
प्रतिस्पर्धी ही मित्र वाटतील. "

Page No.:
Date: / /

**नाव :-** गणेश जगदेवराव रिसोडकर.

**पत्ता :-** ① मु.पो. कुष्टा ता. अचलपुर जि. अमरावती.
② c/o के.एस वडाणे, अप्पर वर्धा कॉलनी अम.
(Mb- 9923035235)

**शिक्षण :-** पदवी (B.A), पदविका (ITI),

**नोकरी (पद) :-** क्लर्क (निवड - क्लर्क MPSC-2011)

**सभासदाचे मनोगत :-**

मनोगत... "खुप झाले जगणे जगवुया आता,
आयुष्य एकवार फुलवुया आता..."

मागील तीन वर्षापासुन स्पर्धापरीक्षा या क्षेत्राशी मी जुळून आहे. या क्षेत्राशी जुळल्यानंतर खऱ्याअर्थाने अभ्यासाला नियोजनाची तसेच सहकार्यांची साथ मला या आपल्या ग्रंथालय सुरू झाल्यापासून झालेली आहे. ग्रंथालयाच्या माध्यमातून मुलांकरीता उपलब्ध विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे व विविध विषयवार मार्गदर्शपर वर्ग मुलांकरीता खुप महत्वाचे ठरत आहेत. माझ्या या छोटयाशा यशामध्ये या बाबीचा निश्चितच खुप मोठा वाटा आहे. यामुळेच मी माझ्या जिवनातील हे यश मिळवू शकलो असे मला वाटते.

माझ्या मते, आपले ग्रंथालय समाजाभिमुख

दृष्टीकोन ठेवून कार्य करत आहे. समाजातील सुपिक डोक्यांच्या पण दिशाहीन व भरकटलेल्या तरुणांना ग्रंथालयाच्या माध्यमातून अभ्यासाची दिशा व योग्य मार्गदर्शन मिळत आहे. काळाची योग्य पावले ओळखून प्रशासनातील सकारात्मक बदलाकरं एक दिपस्तंभ म्हणून या ग्रंथालयाची निर्मीती श्री मा. वानखडे सर, व त्याचेच विचार घेऊन चालणारे त्याचे सहकारीवर्गाने केलेली आहे. त्यांच्या विचाराने प्रेरीत होऊनच जिवन वाटचाल आता होणार आहे हे निश्चीत.

ग्रंथालयातील प्रशासन, सहनुभूती, प्रेम आपलेपनं या ग्रंथालयातील सर्वांकडूनच मिळते. यामध्ये श्री. विरेंद्र डोंगरे व श्री प्रविणभाऊ चौधरी यांचावाटा निश्चीतच मोठा आहे. अशा वातावरणातून तयार अधिकारी समाजाभिमुख जबाबदार व संवेदनशील मनाचा असतो असे मला वाटते.

शेवटी ऋणा घेण्याची भाषा मी वापरणार नाही. कारण ऋणामध्ये राहणे मला आवडते. या ग्रंथालयाचा एक भाग म्हणूनच मला राहायचे आहे.

धन्यवाद.

आपला

[signature]



नाव :- प्रशांत श्रीरामजी घोंगडे

पत्ता :- मु.पो. अळणगांव ता भातकुली जि अमरावती

शिक्षण :- एम. ए. (राज्यशास्त्र)

नोकरी (पद) :- ग्रामसेवक, ~~मल~~ (एम.पी.एस.सी लीपिक)

सभासदाचे मनोगत :- मी महिला व बालविकास स्पर्धा परीक्षा ग्रंथालयाच्या सभासद ३ ऑक्टोबर २०१० या रोजी झालो माझे पूर्ण नाव प्रशांत श्रीरामजी घोंगडे मी एका लहानश्या खेड्यातील रहिवाशी आहे. मी स्पर्धा परीक्षेची सुरुवात जानेवारी पासुन केलेली आहे. सुरुवातीला मी स्पर्धा परीक्षेची तयारी गावात करत होतो परंतु मला गावात कोणी मार्गदर्शक मिळाला नाही तसेच माझ्या अभ्यासाला योग्य दिशा मिळत नव्हती नंतर मी अमरावतीला आल्यानंतर येथे महिला व बालविकास स्पर्धा परीक्षा ग्रंथालय व अभ्यासिका विषयी माहिती मिळाली व मी ॲडमिशन घेतली येथे आल्यावर मला सहकार्यपूर्ण स्वभावाचे, अभ्यासु, मनमिळाऊ मित्र मिळाले त्याची मला माझ्या अभ्यासात मदत झाली व या ग्रंथालयात आल्यानंतर एका वर्षात माझी ग्रामसेवक (अमरावती जिल्हा परिषद) व m.p.s.c. क्लर्क अशा दोन पदावर निवड झाली

येथील ग्रंथपाल ① श्री प्रविनभाऊ चौधरी
② विरेंद्रभाऊ डोंगरे यांचे मला बहुमुल्य मदत मिळाली.
त्यांनी वेळोवेळी मला सहकार्य केले तसेच
सुख दुखाच्या प्रसंगात मला आधार दिला त्यामुळे
त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहे तसेच
ग्रंथालयाचे संचालक श्री वानखडे साहेब यांची
सुद्धा ग्रंथालयातील विद्यार्थ्यांना वेळोवेळी मदत होते
मार्गदर्शन होते ते कुटूंबातील सदस्याप्रमाणे ग्रंथालयात
विद्यार्थ्यांना काय पाहिजे स्वता चौकशी करतात
त्यामुळे त्यांच्यासारख्या व्यक्तीच्या हाती या
ग्रंथालयाची धुरा आहे हे ग्रंथालयातील
विद्यार्थ्यांचे भाग्यच म्हणावे लागेल ~~सेव~~ येथे
सर्वच प्रकारची पुस्तके उपलब्धता आणि उत्कृष्ठ
दर्जाची पुस्तके उपलब्ध आहेत आणि शेवटी
मला नमुद्र सागावयास आहे कि येथील स्टॉफ व
येथील वातावर अभ्यासाला पोषक आहे.

धन्यवाद

आपला विद्यार्थी
[signature]



**नाव :-** कु. निता महेंद्र शिवपुरे

**पत्ता :-** चपराशीपुरा कॅम्प, आंबेडकर वस्तीगृहा मागे, अमरावती Pin. code 444602

**शिक्षण :-** B. com.

**नोकरी (पद) :-** उपलेखापरिक्षक / वरिष्ठ लिपीक

**सभासदांचे मनोगत :-** मी निता शिवपुरे आपल्या सर्वांचे म्हणजे सर्वात आधी श्री वानखडे सर, श्री ढोंगरे सर आणि श्री प्रविन भाऊ यांचे आभार मानते.

सर्वात आधी सांगायचे म्हणजे या ग्रंथालयात गेलेले सुरेख सुंदर आणि आठवणीतील दिवस. या ग्रंथालयात बरेच काही शिकायला मिळाले आणि बरेच काही अनुभवालाही मिळाले. हे ग्रंथालय म्हणजे फक्त चार भिंती आणि छपराची इमारत नसुन आयुष्यात खुप काही करण्या साठीचे एक व्यासपीठ आहे येथे येणे अभ्यास करणे आमच्या आयुष्याचा एक महत्वाचा भाग होता. सर्व ग्रंथालयात फक्त अभ्यासाठी जागा आणि पुस्तके पुरवण्यात येतात पण आपल्या ग्रंथालयात मोफत क्लासेस घेतले जाते. उत्कृष्ट शिक्षक वर्गाचा लाभ आम्हाला झाला.

डोंगरे सर आम्हाला नेहमी अभ्यासा साठी पुस्तका साठी मार्गदर्शन करायचे आणि प्रविण भाऊ एक अबोल पण बोलके व्यक्तीमहत्व ते खुप कमी बोलतात पण सगळ्यांना वर बरोबर लक्ष ठेवतात आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आमचे सर्वांचे नाव प्रविण भाऊंना माहीत आहे.

माझ्या यशात माझे मित्र - मैत्रिणी व या ग्रंथालयात मोलाचा वाटा आहे.
ग्रंथालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनी

साठी :-

जीवन आहे अनमोल
मोल त्याचे ओळखा
ओळखूनी त्यात स्वतःला
प्रत्येक स्पर्धा जिंका.

आणि सर्वात महत्तवाचे म्हणजे या ग्रंथालयाया

साठी :-

तुटले जरी नाते अपुले
सुटले जरी बंध
तरी आठवत राहातील
या भिंती आपुले
ऋणानुबंध.

आपली विद्यार्थीनी
निता शिवपुरे
NShivpure



नाव :- राहुल मोहन भोयर

Email Id :- rahulbhoyar11@gmail.com, mob No 8421009999

पत्ता :- मु. बेलोरी, पो. चालबर्डी
ता. पांढरकवडा जि. यवतमाळ - 445302

शिक्षण :- एम. ए. बी. एड

नौकरी (पद) :- 1) लिपीक, लेखापरिक्षण विभाग नाशिक, 2) कनिष्ठ व वरिष्ठ लिपीक सहकार (Adm) विभाग पुणे, 3) MPSC-clerk.

सभासदांचे मनोगत :-

कोशिश करने वाले की कभी हार नही होती।
लहरोंसे डरकर नौका पार नही होती।।

या पंक्तीप्रमाणे जर प्रत्येकाने आपल्या ध्येयाकडे वाटचाल करणे ही काळाची गरज आहे. अभ्यास तर सर्वच मुले करतात पण तेच यशस्वी होतात जे अपयशाचा जिनाही चढून खचून जात नाही. अपयश आल्यानंतर धैर्य देण्याचे कार्य पानखडे सर यांनी केलेले आहेत.

मी महिला व बालविकास स्पर्धा परिक्षा ग्रंथालय येथे 5 जाने 2012 ला प्रवेश घेतला. माझ्यासारख्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांना वाचनाची व स्पर्धापरिक्षांचा अभ्यास करण्याची आवड विविध लेखकांची परिक्षाभिमुख पुस्तकांची उपलब्धता, इतर ग्रंथालयीन सोईसुविधा यांच ग्रंथालयाच्या आवारामध्ये उपलब्ध झाल्या माझे यश हे तुमच्या समोर आहे.

वानखडे सरांनी ग्रंथालयाची आम्हा सर्व गरिब व होतकरु विद्यार्थ्यांना उपलब्ध करून ~~त्यामुळे~~ आजच्या भारत निर्मितीची धुरा त्यांनी उचललेला आहे. व त्यांचे मोलाचे मार्गदर्शन मी कधीच विसरु शकत नाहीत. त्याचबरोबर त्या ग्रंथालयातील (1) श्री प्रविणभाऊ चौधरी (2) विरेंद्रभाऊ डोंगरे यांनी मला वेळोवेळी मदत केलेली आहे. ती मग कशाचीही ~~आहे~~. असे. त्यांनी मी सांगितलेली पुस्तके लगेच २ दिवसामध्ये मला उपलब्ध करून दिलेले आहे. म्हणून मला असे वाटते,

"ग्रंथालय असावे तर असे!"

धन्यवाद !

आपलाच मित्र
राहुल मोहन भोयर

नाव :- पंकज वाल्मीकराव खानझोडे.

पत्ता :- गुरुदेव नगर, हार्दीक कॉलनीमागे कठोरा नाका
अमरावती.

शिक्षण :- M.A (English)

नोकरी (पद) :- कार्यरत : लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव; ललाटी, त्रि.का. हिंगोली-; लिपीक, प्रकल्प आयुक्त का. जालना; परीचर, जि.प. यवतमाळ-2011

सभासदांचे मनोगत :-

सर्वांना सस्नेह नमस्कार :- सर्वप्रथम मी मा. श्री नरेंद्र वानखडे सरांचे मनस्वी आभार प्रकट करू इच्छितो. मी माझा स्प. अभ्यास संत गाडगेबाबा अम. वि. पासुन सुरुवात केली परंतु सदर ग्रंथालयात पुरेसे पुस्तक उपलब्ध नसल्याने नंतर काही दिवस शासकीय ग्रंथालय अमरावती येथे सुद्धा अभ्यास केला परंतु तेथे सुद्धा ॲडमिशन मिळाली नाही झाले तरी खास: पुरेसे पुस्तके उपलब्ध नव्हती. आणी माहे एप्रील-2010 च्या सुमारास श्री नरेंद्र वानखडे यांचे मार्गदर्शनाखाली महिला व बालविकास स्पर्धा परीक्षा ग्रंथालय सुरु झाले.. मी लगेचच ॲडमिशन घेतली. सदर ग्रंथालयात अत्यल्प मुले होती. मला त्या ग्रंथालय पुस्तके उपलब्ध झाली. व माझी सर्वांत महत्वाची अडचण दूर झाली. व ग्रंथालय सुरु

केल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीतच मी नोकरीला लागलो.

मा. श्री. नरेंद्र वानखडे यांची इच्छा आहे या ग्रंथालयातून IAS/IPS अधिकारी घडावे. सर्व विद्यार्थ्यांनी यासाठी मनापासून मेहनत करावी. ही मी विनंती.

या ग्रंथालयातील श्री. विरेंद्र डोंगरे हे अत्यंत मनमिळाऊ व चांगल्या स्वभावाचे आहेत. त्यांनी आम्हाला शक्य तो सर्व प्रकारची मदत केली. यासाठी मी श्री. डोंगरे सर व चौधरी सर यांचे आभार मानतो.

मी विद्यार्थ्यांना सांगु इच्छितो की मुले जे वर्ष अभ्यास करतात त्यांचे हाती अपयश येते ते खचुन जातात. त्यांनी खचुन न जाता त्यांचे हातु ज्या अभ्यासात चुका होतात त्या दुर करुन जो प्रयत्न करावे. यश नक्कीच येईल. कारण एक दिवस सर्वांचाच येतो.

धन्यवाद

नितीन शिरसाट



**नाव :-** मंगेश दादाराव गायगोले. 9423331152.

**पत्ता :-** प्रकविरा कॉलनी, अमरावती.

**शिक्षण :-** B.A. M.A.

**नौकरी (पद) :-** MPSC - CLARK.

## सभासदाचे मनोगत :-

मित्रांनो मनोगत सांगताना मि सर्वप्रथम माझ्या आई वडिलाचे आभार मानतो कि, त्यानी माझ्या प्रत्येक निर्णयाचे समर्थन केले. आणि माझे ध्येय मि त्याच्या समोर ठेवल्यामुळे मि या परिक्षेची तयारी चांगल्या प्रकारे करू शकलो या ग्रंथालयात मि ~~माझ्या~~ माझा मित्र मोहन-याच्या सोबत अभ्यासाला आलो. आणि या ग्रंथालयातील सुविधांचा उपयोग चांगल्या पद्धतीने आणि अभ्यासाचे नियोजन केल्यामुळे यश प्राप्त झाले.

मि या ग्रंथालयाचे कर्ते श्री नरेह. वानखडे सर यांचेही आभार मानतो की त्यानी हा प्रेरणादायी व जिवन घडवणारे प्रकल्प हाती घेऊन एक चांगले काम के

अनेक विद्यार्थी या ग्रंथालयात येवून आपले आयुष्य घडवतील अशी आशा बाळगतो.

तसेच या ग्रंथालयातील श्री. प्रविन चौधरी व श्री विरेन्द्र डोंगरे याचे हि आभार मानतो कि त्यानी आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन केले.

मी माझ्या सर्व ग्रंथालयातील मित्रांना त्यांच्या येणाऱ्या स्पर्धा परिक्षानसाठी त्याना शुभेच्छा देतो.

धन्यवाद !

आपला विश्वासू

Manwar




नाव :- दिपक सहदेवराव चव्हाण . 9890921453

पत्ता :- रा. अळणगांव ता. मोताकुर्ली
जि. अमरावती

शिक्षण :- B.A (Part III)

नौकरी (पद) :- लिपिक

समासदाचे मनोगत :-

मी महीला व बालविकास स्पर्धा परीक्षा ग्रंथालयाच्या सभासद 1 डिसेंबर 2010 रोजी झालो माझे पूर्ण नाव दिपक सहदेवराव चव्हाण मी एका छोट्याश्या गावातील रहिवासी असुन मी स्पर्धा परीक्षेची सुरुवात मार्च महिन्यापासुन चांगली सुरुवात केली. सुरुवातीला मी स्पर्धा परीक्षेची तयारी रूम वर मांडयाली राहुन करत होतो. परंतु मला रूम वर योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने मी महीला व बालविकास स्पर्धा परीक्षा ग्रंथालयाचा सभासद झालो, तसेच माझ्या अभ्यासाला चांगली दिशा मिळाली. व मला येथे सहकार्यपुर्ण स्वभावाचे व अभ्यासु मनमिळाऊ मित्र मिळाले. त्याची मला चांगली साथ मिळाली. व मला माझ्या अभ्यासात मदत झाली.

व या ग्रंथालयात आल्यानंतर एका वर्षाच्या आत मध्ये मला जलसंपदा विभाग मध्ये क्लार्क या पदासाठी माझी निवड झाली.

येथील ग्रंथपाल श्री विरेंद्रभाऊ डोंगरे व प्रविणभाऊ चौधरी यांची मला बहुमूल्य मदत मिळाली. त्यांनी मला वेळोवेळी मला सहकार्य केले. त त्यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहे. तसेच ग्रंथालयाचे संचालक श्री वानखडे साहेब य सुध्दा ग्रंथालयातील विद्यार्थ्यांना वेळोवेळी मदत मिळा व ते आम्हाला त्यांचे बहुमूल्य वेळ सुध्दा देत होते ते घरच्या सदस्याप्रमाणे ग्रंथालयातील विद्यार्थ्यांना काय पाहिजे. स्वता चौकशी करतात.

त्यांच्यासारख्या मोठ्या व्यक्तींच्या हातीं या ग्रंथालयाची धुरा आहे. हे ग्रंथालयातील विद्यार्थ्यां भाग्य म्हणावे लागेल व ती नोकरी मी माझ्या ज ग्रंथालयातील मित्रांना त्यांच्या येणाऱ्या स्पर्धा परिक्षांसाठी त्यांना शुभेच्छा देतो.

धन्यवाद !

आपला विश्वासू

[signature]



नाव :- संदीप सुदाम व्यवहारे

मो.नं: 8805136974

पत्ता :- मु.साई (ई.) पो. काळी (दौ.)

ता. महागांव जि. यवतमाळ.

शिक्षण :- एम.ए.

नोकरी (पद) :- कनिष्ठ लिपीक जलसंपदा (कोल्ह

सभासदाचे मनोगत :- मी २०११ ला या लायब्ररीमध्ये अडमिशन केले आणि आता वाटते की आपण कोणतीही परिक्षा पास होऊ शकतो. कारण या लायब्ररीमध्ये सर्व स्पर्धात्मक पुस्तके उपलब्ध आहेत.

जेव्हापासून मी अभ्यास करायला येतो आलो तेव्हापासून सर्व चांगले मित्र मिळाले चर्चाकरून अभ्यास केला. सर्व प्रकारचे स्पर्धा परिक्षेला लागणारे साहित्य उपलब्ध झाले. मी तसा महागांव तालुक्यातील यवतमाळ जिल्ह्यातील कारण आमच्या भागात स्पर्धात्मक वातावरण नाही. पण या लायब्ररीमध्ये अडमिशन केले आणि कनिष्ठ लिपीक जलसंपदा विभ कोल्हापूर येथे निवड झाली.